# <u>सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. सातारा</u>

## -☆ <u>परिपत्रक</u> ☆-

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेच्या दि. ०९/०९/२०१८ रोजीच्या वार्षिक सभेतील ठराव क्र. १३ नुसार व मा. संचालक मंडळ मासिक सभा दि. ०७/१०/२०१८ मधील ठराव क्र. १० नुसार **<u>माहे डिसेंबर २०१८</u>** पासून **<u>तातडीचे कर्जाची मर्यादा रू. २०,०००/-(रू. वीस हजार फक्त)</u>** करणेत आले आहे.

**तातडीचे कर्जाची परतफेड कमीत कमी रक्कम रू.१,७००/- जास्तीत जास्त हप्ते १२ करणेत आले आहे.**

तातडीचे कर्जास नुतणीकरण सुविधा लागू राहणार नाही. तातडीचे **<u>कर्जाचे ६ हप्ते नियमीत</u>** आले शिवाय कर्ज बाकी रोखीत भरूनही नवीन तातडीचे कर्ज प्रकरण केले जाणार नाही. संस्थेची अंतर्गत तपासणी करत असताना असे लक्षात आले आहे की, अनेक सभासद दोन पेक्षा जास्त कर्जदारांना जामीन राहत आहेत. ही बाब संस्था पोटनियमाच्या विरूध्द आहे. तरी, सर्व सभासदांना विनंती करणेत येते की, जामीनदार म्हणून सही करताना आपण यापूर्वी किती सभासदांना जामीन आहोत याची खात्री करावी. तसेच कर्ज अर्ज देणारे सभासदांना विनंती करणेत येते की, आपले जामीनदार सभासद हे यापूर्वी दोन पेक्षा जास्त कर्जदारांना जामीनदार आहेत किंवा नाही. याबाबत खात्री करावी.

तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

आपले विश्वासू

सचिव

सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी
सहकारी पतसंस्था मर्या., सातारा